# रोमिओ अँड ज्यूलिएट: विल्यम शेक्सपियर

मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

<u>प्रास्ताविकः</u>

आतापर्यंत आपण शेक्सपियरच्या ४ स्वभावजन्य शोकांतिका- Tragedy of Character - अभ्यासिल्या. शेक्सपियरच्या शोकांतिकेचे स्थूल दोन भेद पडतात -

१. स्वभावजन्या शोकांतिका - मुख्यतः नायकाच्या स्वभावातील एखाद्या छोट्या दोषामुळे होणारी शोकांतिका - स्वभावजन्या किंवा व्यक्तिनिष्ठ.

२. दैव / नियती / योगायोगजन्य शोकांतिका [Tragedy of Fate] - दुर्दैवी घटनामुळे घडणारी शोकांतिका.

प्रत्येक शोकांतिकेमध्ये हे दोन्ही घटक असतात पण ज्याचा प्रभाव अधिक त्यानुसार शोकांतिकेचा प्रकार ठरतो. हॅम्लेट, मॅक्बेथ, किंग लिअर व ऑथेलो या सर्व शोकांतिकात दैवाचा भाग नव्हता असे नाही. उदा. मॅक्बेथला चेटकिणी भेटणे, हॅम्लेटला वडिलांचे भूत भेटणे. पण दैवाचा भाग फार कमी/गौण असतो. नायकाच्या स्वभावातील दोष हा प्रमुख/प्रभावी घटक आहे. या उलट दैववादी शोकांतिकेमध्ये [दु]र्दैवाचा घटक फार प्रभावी असतो. स्वभावातील दोष हा फार गौण घटक असतो. आपण आता ज्या जगप्रसिद्ध शोकांतिकेचा परिचय करून घेणार आहोत त्या शोकांतिकेचे नाव आहे ’रोमिओ अँड ज्यूलिएट’. दृष्ट लागेल असे हे प्रेमी जोडपे सुरूवातीपासूनच दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडते आणि ते दुर्दैव शेवटपर्यंत त्यांची पाठ सोडत नाही. Prologue मध्ये शेक्सपियर त्यांचे वर्णन करतो - 'A pair of star-crossed lovers'. चला तर एक नॅपकिन घेऊन बसा डोळे पुसण्यासाठी.

<u>प्रमुख पात्रेः</u>

| | |
|---|---|
| एस्केलसः | व्हेरोनाचा ड्यूक |
| मॉटेग्यु व कॅप्युलेटः | दोन उमराव घराणी, एकमेकांचे पिढिजाद हाडवैरी |
| रोमिओः | मॉटेग्यु जोडप्याचा एकुलता मुलगा |
| ज्यूलिएटः | कॅप्युलेट जोडप्याची एकुलती मुलगी |
| टायबाल्टः | कॅप्युलेटचा पुतण्या |
| पॅरिसः | ड्यूकचा नातेवाईक, उमराव |
| मर्क्युशिओ/बेन्व्होलिओः | रोमिओचे दोन जिवलग मित्र; मर्क्युशिओ हा ड्यूकचा नातेवाईक |
| फ्रायर लॉरेन्सः | एक दयाळू धर्मोपदेशक; रोमिओचा हितचिंतक |
| फ्रायर जॉनः | लॉरेन्सचा कनिष्ठ सहकारी. |

<u>कथानकः</u>

व्हेरोना हे इटलीमधील एक प्रमुख शहर/संस्थान असते. त्याचा अधिपती ड्यूक एस्केलस हा असतो. व्हेरोना संस्थानात मॉंटेग्यु व कॅप्युलेट ही प्रमुख उमराव घराणी असतात. या दोन कुटुंबांत

पिढ्यानपिढ्या चालत आलेले व कसोशीने जपलेले हाडवैर असते. हे वैर केवळ कुटुंबप्रमुखापुरतेच मर्यादित नसते तर त्यांचे नोकरसुद्धा रस्त्यात समोरासमोर आले की लगेच वादावादी, भांडण सुरू करीत; बरेच वेळा त्याचे पर्यवसान मारामारीतही होत असे.

मॉटेग्यु पतिपत्नीना रोमिओ नावाचा एक एकुलता एक मुलगा असतो, सुंदर, सुस्वभावी, तर कॅप्लेट दांपत्याला ज्यूलिएट नावाची सुंदर, जेमतेम १४ वर्षांची सुकुमार एकमेव कन्या असते. त्यांचा पुतण्या तायबाल्ट हा एक शीघ्रकोपी, घराण्याचे वैर एकनिष्ठेने पाळणारा असतो.

नाटकाची सुरूवातच दोन्ही कुटुंबातील नोकरांच्या भांडणाने होते. रस्त्यात ते समोरासमोर येतात आणि क्षणार्धात भांडण सुरू होते, मुद्यावरून गुद्यावर जाते. टायबाल्ट [कॅप्युलेट] आणि बेन्व्होलिओ [मॉटेग्यु] हेही भांडण थांबवण्याऐवजी स्वतःच मारामारी सुरू करतात; सगळा हलकल्लोळ उडतो. शेवटी दोन्ही कुटुंबप्रमुख आणि ड्यूक आपल्या संरक्षक अधिकाऱ्यासह तेथे येतात. भांडण थांबवले जाते. परत परत उद्भवणाऱ्या दोन घराण्यांतील या भांडणांनी वैतागलेला ड्यूक दोन्ही कुटुंबप्रमुखांना फर्मावतो, "आता परत असे भांडण होऊन शहराची शांतता बिघडली तर दोन्ही कुटुंबप्रमुखांना देहांत शासन दिले जाईल."

रोमिओचे रोझॅलिन नावाच्या एका सुंदर पण कठोर अंतःकरणाच्या तरूणीवर प्रेम असते. पण ती त्याला जराही प्रतिसाद देत नाही. ते दुखः विसरण्यासाठी बेन्व्होलिओच्या आग्रहावरून रोमिओ कॅप्युलेटच्या पार्टीला जातो. तेथे शहरातील एकाहून एक शेकडो सुंदर तरूणी येणार असतात. पण रोमिओ हा वैरी पक्षाचा असल्यामुळे त्याचे जाणे धोक्याचे असते. तरीही वेष बदलून व तोंडावर मुखवटे चढवून ते दोघे पार्टीला जातात.

ज्युलिएटला पाहताच रोमिओ रोझॅलिनला पार विसरतो व ज्युलिएटच्या [प्रथम दर्शनी] प्रेमात पडतो. तिला पाहताच त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडतात, "She hangs upon the cheek of night like a rich jewel in an Ethiop's ear". पुढे होऊन तो तिच्याशी नृत्य करतो, तिच्या सौंदर्याची स्तुती करतो, आणि तीही त्याच्या प्रथमदर्शनी प्रेमात पडते. निघता निघता दोघांची एकमेकांना ओळख पटते पण त्यामुळे त्यांच्या प्रेमाचा आवेग कमी होत नाही.

पार्टीमध्ये एक अप्रिय गोष्ट घडते. टायबाल्टला रोमिओचे अस्तित्व लक्षात येते. चिडून लगेच तो त्याला आव्हान देण्याच्या तयारीत असतो. पण त्याचे काका उमराव कॅप्युलेट त्याला रोकतात व तो वैरी असला तरी आता आपला पाहुणा आहे हे बजावतात. त्यामुळे अनिष्ट प्रसंग टळतो.

त्या रात्री रोमिओ ज्यूलिएटला गुप्तपणे भेटायला जातो. अंधारात दोघेही प्रेमाच्या आणाशपथा घेतात आणि लगेच लग्न करायचेही ठरवतात. प्रेमाच्या गप्पात रात्र केंव्हा संपली व पहाट केंव्हा झाली हे त्यांना कळतच नाही.

दुसरे दिवशी रोमिओ त्याचा हितचिंतक फ्रायर लॉरेन्स याला भेटतो व त्याच दिवशी लग्न करायचे ठरवतो. एवढ्या घाईघाईत लग्न करण्याच्या रोमिओच्या हट्टाबद्दल फ्रायर आपली नाराजी व्यक्त करतो. त्याचे शब्द भविष्यसूचक ठरतात, "These violent delights have violent ends". दुपारी त्यांचे लग्न होते आणि ज्यूलिएट घरी परतते.

दुपारी बेन्व्होलिओ व मर्क्युशिओ रोमिओला शोधत असताना त्याना टायबाल्ट भेटतो. पार्टीमध्ये रोमिओ येऊन गेल्यामुळे खदखदत असलेला टायबाल्ट त्यांच्याशी भांडण उकरून काढतो. टायबाल्ट आणि मर्क्युशिओ यांची खणाखणी चालू असताना रोमिओ तेथे येतो. पत्नीचा भाऊ या नात्याने टायबाल्टबद्दल आपुलकी निर्माण झालेला रोमिओ त्यांची मारामारी थांबवण्याचा प्रयत्न करतो. मधे हात घालून त्यांच्या तलवारी अडवण्याच्या प्रयत्नात टायबाल्ट रोमिओच्या हाताखालून तलवार मर्क्युशिओच्या पोटात खुपसतो. रोमिओच्या मध्यस्थीमुळे आपण मरत आहोत यामुळे चिडलेला मर्क्युशिओ रोमिओला दोषी ठरवत खाली कोसळतो व थोड्याच वेळात मरतो. आपण मदत दिल्यामुळे टायबाल्ट वाचला व मित्र गेला या अपराधी भावनेने उसळलेला रोमिओ समोर टायबाल्ट दिसताच त्याच्याशी मारामारी सुरू करतो व तलवारीच्या एका घावाने टायबाल्टला कंठस्नान घालतो. त्याचवेळी ड्यूक एस्केलस तेथे येतो. आपला जवळचा नातेवाईक मर्क्युशिओ या मारामारीत रोमिओमुळे मारला गेला आहे हे कळताच तो रोमिओने २४ तासांच्या आत व्हेरोना सोडून कायमचे निघून जावे अशी शिक्षा फर्मावतो. ज्यूलिएटला ही बातंमी लगेचच नर्सकडून कळते - Tybalt dead and Romeo banished. एकाच वेळी भाऊ आणि पती यांच्या वियोगाच्या या वार्तेने ती हतबुद्ध होते. दुर्दैवाचा हा आघात तिला हतप्रभ करतो. ती नर्सला रोमिओला ताबडतोब घेऊन ये असे सांगून पाठवते.

दरम्यान रोमिओ आपल्या हितचिंतक मार्गदर्शकाला - फ्रायरला - भेटतो. फ्रायरचे रोमिओवर प्रेम असते, व रोमिओ-ज्यूलिएट विवाहाने दोन्ही घराण्यातील वैर संपावे अशी तो आशा करत असतो, पण दुर्दैवाने नशिबाचे फासे उलटे पडतात. हद्दपारीची शिक्षा ऐकून रोमिओ उध्वस्त झालेला असतो. त्याला ही शिक्षा मृत्यूपेक्षाही कठोर वाटते. फ्रायर त्याला सर्व मार्गांनी - गोड बोलून, समजावून, फैलावर घेऊन - ताळयावर आणतो व त्याला मांटुआ या त्याच्या हद्दपारीच्या गावी जायला राजी करतो. रोमिओच्या नोकराकरवी त्याला घडणाऱ्या गोष्टींचा वृत्तांत कळवण्याची हमी देतो. सर्व मार्गांनी प्रयत्न करून, ड्यूकचे मन वळवून त्याची शिक्षा रद्द करण्याचे आश्वासन देतो. ती रात्र ज्यूलिएटच्या सहवासात घालवून रोमिओ दुसरे दिवशी जड अंत:करणाने तिचा निरोप घेऊन मांटुआला रवाना होतो.

आपण थोडासा घटनांचा क्रम पाहिला तर लक्षात येईल की रविवारी रात्री कॅप्युलेटची पार्टी होते व रोमिओ-ज्यूलिएटची पहिली भेट होते. सोमवारी सकाळी गुप्त भेटीत त्यांच्या प्रेमाच्या आणाभाका होतात व त्याच दिवशी ११ वाजता त्यांचे कोणालाही न कळता गुप्तपणे लग्न होते. त्याच दिवशी दुपारी टायबाल्ट मारला जातो व रोमिओला हद्दपारीची शिक्षा होते. संध्याकाळी रोमिओ फ्रायरशी बोलून पुढील योजना ठरवतो. रात्री तो ज्यूलिएटच्या सहवासात राहतो व मंगळवारी पहाटे तो

मांटुआला रवाना होतो. घटना किती जलद गतीने घडत आहेत व दुर्दैव त्यांचा किती सातत्याने पाठलाग करते आहे हे लक्षात येईल. पण इथे दुष्टचक्र थांबत नाही. सोमवारी संध्याकाळी पॅरिस हा ड्यूकचा निकटचा नातेवाईक कॅप्युलेटजवळ ज्यूलिएटसाठी मागणी घालतो. कॅप्युलेट खूष होऊन ती मागणी मान्य करतो व लगेच गुरूवारी सकाळी त्यांचा विवाह निश्चित करतो व तसे पॅरिसला आश्वासन देतो. ज्यूलिएट टायबाल्टच्या मृत्यूचा शोक करते आहे अशी समजूत करून तो तिला काहीही विचारत नाही. मंगळवारी सकाळी कॅप्युलेट आपली ती योजना ज्यूलिएटला सांगतो व बापाच्या अधिकारात ती तिच्यावर लादतो. या विचित्र संकटात सापडलेली ज्यूलिएट मंगळवारी संध्याकाळी फ्रायरची भेट घेते व त्याच्याजवळ मदतीची मागणी करते. अन्यथा जीव देण्याचा आपला निश्चय जाहीर करते. फ्रायर तिचा हा निर्णय ऐकून तिला सुटकेचा एक जोखमी मार्ग सुचवतो. तो तिला एक गुंगीचे औषध देतो ज्यामुळे ती ४२ तास निर्जीव अवस्थेत राहील. बुधवारी रात्री ते औषध घेतल्यानंतर गुरूवारी सकाळी ती सर्वांना मृतावस्थेत सापडेल. तिला मृत समजून तिच्यावर अंत्यसंस्कार केले जातील व तिला कॅप्युलेट घराण्याच्या राखीव शवागारात ठेवले जाईल. ४२ तासानंतर ती ज्यावेळी शुद्धीवर येईल त्यावेळी फ्रायर व [त्याने बोलावून घेतलेला] रोमिओ तिथे हजर असतील व तिला घेऊन रोमिओ मांटुआला निघून जाईल. ज्यूलिएट या बेताला पूर्ण संमती देते. फ्रायर तिला वरकरणी पॅरिसशी लग्न करायला तयार असल्याचे नाटक करण्याचे व तशी तयारी करण्याचे सुचवतो. औषध घेऊन ज्यूलिएट घरी येते व आपण लग्नाला तयार असल्याचे सांगते. सगळे खूष होतात व कोणालाच कसलाही संशय येत नाही.

बुधवारी रात्री ज्यूलिएट ते औषध घेते. दुसऱ्या दिवशी सकाळी तिला मृतावस्थेत पाहून सगळीकडे हाहाकार होतो. रिवाजाप्रमाणे तिचा मृत देह सर्व संस्कार करून घराण्याच्या शवागारात [Monument] आणून ठेवला जातो.

दरम्यान फ्रायर लॉरेन्सने रोमिओला सविस्तर पत्र लिहून त्याला शुक्रवारी सकाळी स्मशानात बोलावले असते. दुर्दैवाने ते पत्र घेऊन गेलेला फ्रायर जॉन मांटुआमधे अडकतो व रोमिओला पत्र न देताच गुरूवारी संध्याकाळी परत येतो. फ्रायर लॉरेन्सच्या काळजाचा ठोका चुकतो. इकडे रोमिओचा नोकर ज्यूलिएटच्या मृत्यूचे वृत्त घेऊन रोमिओला भेटतो. दुःखाला पारावार न राहिलेला रोमिओ जालिम विष खरेदी करतो व शुक्रवारी पहाटेच स्मशानभूमीत येतो. त्याचवेळी ज्यूलिएटला श्रद्धांजली अर्पण करायला आलेला पॅरिस आणि रोमिओ यांची चकमक उडते व पॅरिस मारला जातो. पुढे होऊन रोमिओ ज्यूलिएटच्या मृत देहाजवळ शोक व्यक्त करतो व विषाची बाटली तोंडाला लावून तिच्या देहाजवळ मरून पडतो.

४२ तास संपताच ज्यूलिएट शुद्धीवर येते. शेजारी मरून पडलेल्या रोमिओला पाहताच व त्याच्या तोंडाला लावलेली विषाची बाटली पाहताच तिला सर्व कळून चुकते. तेवढ्यात फ्रायर लॉरेन्स तेथे येतो. दुर्दैवाने आपला डाव साधल्याचे त्याच्या लक्षात येते. सकाळ झाल्यामुळे पहारेकरी जमू लागतात. फ्रायर ज्यूलिएटला लपायची सूचना करतो व स्वतः लांब जातो. ज्यूलिएट रोमिओच्या कमरेला खोचलेली कट्यार काढून स्वतःच्या देहात खुपसते व रोमिओच्या देहावर मरून पडते.

शहरात ही वार्ता पसरताच ड्यूक, मॉटेग्यु आईबाप, व कॅप्युलेट आईबाप स्मशानात गोळा होतात. हृदय हेलावून सोडणारा तो देखावा पाहताच सर्वजण शोकाकूल होतात. फ्रायर सर्व घटनांचा सविस्तर कबुलीजबाब देतो. ड्यूकच्या आज्ञेने दोघेही कुटुंबप्रमुख आपले पिढीजाद वैर संपवण्याची शपथ घेतात. मॉटेग्यु आपल्या सुनेचा, ज्यूलिएटचा सोन्याचा पुतळा मुख्य चौकात उभारण्याची घोषणा करतात व कॅप्युलेट आपल्या जावयाचा, रोमिओचा सोन्याचा पुतळा तिच्याशेजारी उभारण्याची घोषणा करतात. एका कोवळ्या प्रेमाच्या करूण शेवटाने शतकांचे वैर गाडले जाते.

बिचारे निष्पाप, निरागस रोमिओ-ज्यूलिएट त्यांचा काहीही दोष नसताना नियतीच्या क्रूर खेळीला बळी पडतात.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः

Phone: 020-25881194, 9881149755
Email: joshi.bindumadhav@gmail.com